# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १३/०६/२०२२

## मा. विशेष स्थायी समिती सभा
## सभा सूचना क्र. ०३

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती** ............................................
**स्थायी समिती सदस्य/सदस्या,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

यासुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. विशेष स्थायी समिती सभा मंगळवार दि. १४/०६/२०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०३ मधील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती

**मा. सभापती, स्थायी समिती यांच्या मान्यतेने**

(वासुदेव शिरवळकर)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. विशेष स्थायी समिती सभा दि. १४/०६/२०२२ सभा सुचना क्र. ०३ विषयपत्रिका

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ४१ | मनपा क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा कामी भाड्याने 10 BHP ते 19 BHP HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत. |

दिनांक :- १३/०६/२०२२

(वासुदेव शिरवळकर)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दि.१४/६ /2022**

**सार्व. आरोग्य विभाग**

**// गोषवारा //**

**प्रकरण :- ४९ मनपा. क्षेत्रात पावसाळ्या दरम्यान सखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा कामी भाड्याने 10 BHP ते 19 BHP HP क्षमतेचे सक्शन पंप पुरवठा कामाच्या निविदेतील दरास मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात सावचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी सार्व. आरोग्य विभागाकरीता 10 BHP ते 19 BHP क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी दि. 31/05/2022 रोजीच्या दै. बितंबातमी, साप्ताहिक पोलीस मदत पत्र समाचार या वृत्तपत्रात व Tender Id No.2022_MBMC_803635_1 जाहिर निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती.

वर नमुद केलेल्या कामाकरीता मे. मनोहर ट्रेडींग कंपनी, मे. गणेश डेव्हलपर्स व मे. विंध्या ट्रेडर्स यांच्या 03 निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदा अटीशर्तीनुसार सादर केलेली कागदपत्रांची तपासणी केली असता, मे. मनोहर ट्रेडींग कंपनी, मे. गणेश डेव्हलपर्स व मे. विंध्या ट्रेडर्स या तिन्ही निविदा पात्र ठरले असून दराचा लिफाफा उघडणेस निविदा समितीने मंजुरी दिली. त्यानुसार दि. 10/06/2022 रोजी दराचा लिफाफा (Financial Bid) उघडण्यात आले होते.

मे. मनोहर ट्रेडींग कंपनी, मे. गणेश डेव्हलपर्स व मे. विंध्या ट्रेडर्स या निविदाकारांनी सादर केलेल्या दराची तुलना केली असता, मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांचे दर कमी आहेत. मात्र सादर केलेले दराची बाजार भावाशी तुलना केली असता, जादा आहेत. त्यामुळे मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांचे समवेत दरात वाटाघाटी करणेसाठी दि. 10/06/2022 रोजी निविदा समिती समोर बोलविण्यात आले होते. L1 निविदाधारक मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी दर कमी केले असून दर कमी केल्याबाबत लेखी पत्र दिले आहे. L1 निविदाधारक **मे. मनोहर ट्रेडींग कंपनी** यांनी वाटघाटी अंती सादर केलेले दर Estimate पेक्षा जास्त आहेत, मात्र सद्यस्थितीत डिझेलचे वाढलेले दर, कामाचे स्वरुप, आपत्तीच्या वेळी करावयाचे काम याबाबी पाहता, दोन्ही वेळेस निविदेमध्ये आलेले दर विचारात घेता, वाटाघाटी अंती प्राप्त दर मागील वर्षाच्या दरापेक्षा कमी असल्याने तसेच पावसाळा सुरु झाल्याने तातडीची बाब म्हणून **मे. मनोहर ट्रेडींग कंपनी** यांची निविदा स्विकारणेस मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. निविदेतील प्राप्त दरामध्ये वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Type of Suction Pump | मे. गणेश डेव्हलपर्स यांनी सादर केलेले दर | मे. विंध्या ट्रेडर्स यांनी सादर केलेले दर | मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी सादर केलेले दर | L1 निविदाधारक मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांनी वाटाघाटी अंती मान्य केलेले दर |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Dewatering on BHP by using water pump including diversion of stream, providing cofferdams, earthern bunds etc. as may be necessary for foundation and other parts of the works and pumping out water during and after excavation as may be required by using 10 to 19 BHP pump etc. complete. | Rs. 410.00 Per Hour | Rs. 504.00 Per Hour | **Rs. 345.00 Per Hour** | **Rs. 340.00 Per Hour** |
| 2 | Providing Labour including required safety precaution | Rs. 165.00 Per Hour | Rs. 175.00 Per Hour | **Rs. 150.00 Per Hour** | **Rs. 140.00 Per Hour** |
| | **Total** | **Rs. 575.00 Per Hour** | **Rs. 679.00 Per Hour** | **Rs. 495.00 Per Hour** | **Rs. 480.00 Per Hour** |

वरीलप्रमाणे पावसाळ्या दरम्यान सखल /अतिसखल भागात साचणारे पावसाचे पाणी उपसा करणे कामी 10 BHP ते 19 BHP क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने पुरवठा करणे कामी मे. मनोहर ट्रेडींग कंपनी यांची वाटाघाटी अंती मान्य केलेल्या दराची निविदा स्विकारणेस मा. स्थायी समिती सभेची मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

(डॉ. संभाजी पानपट्टे)
अतिरिक्त आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Goshwara Sakshan pump 2022.docx